स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६
दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

***कालमर्यादा - २६/०८/२०२४***

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/पदोन्नती/२०२४/ 3410 दिनांक : 21 AUG 2024

**परिपत्रक :**

**विषय :- गट क च्या दिव्यांग कर्मचा-यांना पदोन्नती देणेबाबत.. निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक)**

संदर्भ : (१) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही १०९९/ प्र.क्र.३७/९९/१६ अ, दिनांक ०५/०३/२००२

(२) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक अप्रवि-२०१८/ प्र.क्र.४६/आरोग्य-६, दिनांक १४/०९/२०१८

(३) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग २०१८/ प्र.क्र.११४/१६ अ, दिनांक २९/०५/२०१९

(४) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग-२०२१/ प्र.क्र.३२/२१/तांशि-१, दिनांक २२/०२/२०२१.

(५) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग-२०१५/ प्र.क्र.१७१/१६-अ, दिनांक ०५/०७/२०२१.

संदर्भित शासन निर्णयातील तरतूदींनुसार **दिव्यांगांसाठी सुनिश्चित केलेल्या पदांवर** या कार्यालयाच्या अधिपत्याखालील शासकीय संस्थामधील **गट क मधील** निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) हे पद अतांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक पदावरील कार्यरत **दिव्यांग कर्मचा-यांमधून पदोन्नतीने** भरावयाचे आहे.

दिव्यांगांसाठी सुनिश्चित केलेल्या पदोन्नतीच्या पदांसाठी वेतनश्रेणी व आवश्यक अर्हता खालीलप्रमाणे.

| अ. क्र. | पदोन्नत पदाचे पदनाम, वेतनश्रेणी व पदसंख्या | शारीरिक पात्रता | दिव्यांग प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| ०१ | निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक)<br>(वेतन स्तर - एस ८ : २५५००-८११००) (०१ पद) | S, ST, W, H, SE, C, BN | OA, OL, BL, HH |

**Abbreviations for column no. 3 :**
S-Sitting, ST-Standing, W-Walking, H-Hearing, SE-Seeing, C-Communication, BN-Bending.

**Abbreviations for column no. 4 :**
OL-One Leg, OA-One Arm, OAL-One Arm & One Leg, BL-Both Leg, BLV-Blind & Low Vision, HH-Hearing Handicapped

सबब आपल्या संस्थेतील अतांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक पदांवरील कार्यरत जे दिव्यांग कर्मचारी सदर पदोन्नतीच्या पदासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करीत असतील त्यांची माहिती खालील प्रपत्रामध्ये भरुन दिनांक **<u>२६/०८/२०२४ पर्यंत</u>** या कार्यालयास त्यांचे **अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतींसह** सादर करावी.

| अ. क्र. | कर्मचा-याचे संपूर्ण नांव | पदनाम | प्रवर्ग व जात | जन्म दिनांक | मूळ नेमणूक दिनांक | शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झाल्याच्या वर्षासह) | जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त केले आहे किंवा कसे ? | शिस्तभंग विषयक कार्यवाही / प्राथमिक चौकशी चालू आहे / नाही | मत्ता व दायित्वे याबद्दलची विवरणपत्रे विहीत प्रपत्रामध्ये सादर केली आहेत किंवा कसे ? | हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण आहेत किंवा सूट मिळाली आहे ? याबाबतची माहिती | संगणक परीक्षा उत्तीर्ण आहेत किंवा कसे ? | स्थायित्व प्रमाणपत्र प्राप्त केले आहे किंवा कसे ? | शेरा / अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |

*कर्मचा-यांचे संस्थेतील उपलब्ध अभिलेख व सेवापुस्तके यामधील नोंदींवरुन, तसेच कर्मचा-यांकडून त्यांची शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे, दाखले इत्यादी घेऊन तपासावीत व माहिती या कार्यालयास सादर करावी.*

*महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११, दिनांक ०२ जून, २०१४ मधील तरतूदींनुसार गट क संवर्गातील प्रत्येक कर्मचा-याने त्याची स्वतःची मत्ता व दायित्वे याबद्दलची विवरणपत्रे विहीत प्रपत्रांमध्ये भरुन संस्था प्रमुखांकडे सादर करणे आवश्यक असल्याने, ज्या कर्मचा-यांनी उपरोक्त पदांवद पदोन्नतीसाठी अर्ज केले आहेत, अशा कर्मचा-यांनी त्यांचे मत्ता व दायित्वे याबाबतचे विवरणपत्रे विहीत प्रपत्रामध्ये भरुन सादर केली आहेत किंवा कसे ? याबाबत खात्री करुनच अर्ज सादर करावेत.*

*गट क संवर्गातील प्रत्येक कर्मचा-याने हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळालेली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे, तसेच संगणक परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.*

***संदर्भ क्रमांक (२) येथील शासन निर्णयातील तरतूदींनुसार महाराष्ट्र शासनाच्या SADM (Software Assessment for Disability Maharashtra) या संगणकीय प्रणालीद्वारा दिव्यांगत्व प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. (सदरचा शासन निर्णय शासनाच्या https://www.maharashtra.gov.in/1145/शासन-निर्णय या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)***

***दिव्यांग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेल्या आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी दिव्यांगत्वाचे किमान प्रमाण ४० टक्के असणे आवश्यक असून, दिव्यांगांचा लाभ घेऊ इच्छिणा-या व्यक्तीने सक्षम प्राधिका-याचे मूळ प्रमाणपत्र / साक्षांकित छाया प्रत सादर करणे आवश्यक राहील.***

***ज्या कर्मचा-यांची सर्वसाधारण (non-handicapped) घटकातून सेवेत नियुक्ती झाली असेल व सेवेत असताना काही कालावधीनंतर अशा कर्मचा-यास दिव्यांगत्व आल्यास, विहीत दिव्यांगत्वाचे वैध प्रमाणपत्र सादर केल्याच्या दिनांकापासून त्या व्यक्तीची सेवा ज्येष्ठता दिव्यांग आरक्षणासाठी ग्राह्य धरण्यात येईल,***

***तसेच एखाद्या दिव्यांग व्यक्तीची गुणवत्तेनुसार, दिव्यांग आरक्षणाचा लाभ न घेता निवड झाली असल्यास, विहीत दिव्यांगत्वाचे वैध प्रमाणपत्र सादर केल्याच्या दिनांकापासून अशा व्यक्तीची सेवा ज्येष्ठता दिव्यांगांच्या आरक्षणासाठी ग्राह्य धरण्यात येईल.***

***दिव्यांग कर्मचा-यांच्या नियुक्तीस / पदोन्नतीस योग्य ठरविण्यात आलेल्या पदांकरिता शासनाने वेळोवेळी विहीत केलेले पदोन्नतीसंदर्भातील नियम, आदेश व निकष (उदा. पदोन्नती लगतच्या पदावरील किमान सेवेचा कालावधी, विहीत विभागीय / सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा, गोपनीय अहवाल इत्यादी) यानुसार कार्यवाही करण्यात यावी.***

*तसेच आपल्या संस्थेतील / कार्यालयातील सदर पदांसाठी पात्र कर्मचा-याची माहिती या कार्यालयास प्राप्त न झाल्यास, तसेच पाठविलेल्या माहितीमध्ये कांही त्रुटी आढळल्यास त्यास सर्वस्वी संबंधित कर्मचा-यांना जबाबदार धरण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी., तसेच सदरचे पत्र आपल्या संस्थेतील / कार्यालयातील सर्व कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून त्याची पोहोच घ्यावी व पुढील कार्यवाही करावी.*

***संस्थेत प्राप्त अर्जाची संस्था स्तरावरच पडताळणी करुन, सदर कर्मचारी पदोन्नतीच्या पदासाठी आवश्यक अर्हता धारण करीत असेल, तरच अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह (साक्षांकित छाया प्रतींसह) या कार्यालयास सादर करावेत. अपूर्ण व अपात्र कर्मचा-यांचे अर्ज सादर करु नयेत.***

*संस्थेमध्ये मधील कर्मचारी उपलब्ध नसल्यास किंवा पदोन्नतीसाठी अर्ज करण्यास इच्छूक नसल्यास **'निरंक'** अहवाल सादर करण्यात यावा.*

*(डॉ. द. व्यं. जाधव)*
*सहसंचालक,*
*तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.*

*प्रत :* *या कार्यालयाच्या अधिनस्त सर्व शासकीय संस्था प्रमुख यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.*

*प्रत :* *या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना संकेत स्थळावर प्रसिध्द करण्याकरिता.*